# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## सुचना

( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये )

क्र.ठामपा/शविवि/ दिनांक-

ज्या अर्थी ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्रमांक टीपीएस / १२९७/ १३१९/सीआर १४८/९७ युडी-१२ दि.१४ ऑक्टोबर १९९९ अन्वये मंजुर झाली असुन २२ नोव्हेंबर १९९९ पासुन अंमलात आली आहे. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion -EP) शासन निर्णय क्र. टीपीएस-१२०१/२७४/सीआर-४/२००१ नवि-१२ दि.३ एप्रिल २००३ अन्वये मंजुर झाली असुन दि.१४ मे २००३ पासुन अंमलात आली आहे . (यापुढे "उक्त " मंजुर विकास योजना " असे संबोधिले आहे. )

ज्याअर्थी मंजूर विकास योजनेत सेक्टर क्र. ९ व सेक्टर क्र. १० येथे कत्तलखानाकरीता एकही आरक्षण दर्शविलेले नाही. सेक्टर क्र. ११ मौजे देसाई येथील आरक्षण क्र. १ अॅबेटोवर दर्शविलेले असून सदर आरक्षण मुंब्रा कौसा विभागापासून ब-याच अंतरावर आहे. आरक्षणाचे अंदाजे ७७% भाग CRZ चे तरतुदीने बाधित होत असून उर्वरित भागात अतिक्रमणे आहेत. सदर आरक्षणास सद्यस्थिती पोहच रस्ता उपलब्ध नाही. सदर आरक्षणाचे स्थान मुंब्रा- कौसा विभागातील लोकांकरीता गैरसोयीचे आहे.

ज्याअर्थी मंजूर विकास योजनेत मौजे मुंब्रा स. नं. ५३ पै., ५५ पै., ५६ पै., ५७ पै., ६० पै., ६१ पै., ५८ पै., ५९ पै., या भूखंडावर व मौजे कौसा स. नं. २८ पै., ते ३० पै., ३२ पै., ३८ पै. या भूखंडावर आ. क्र. ४ रिक्रिएशन ग्राऊंड दर्शविलेले आहे. आरक्षणाचे एकूण क्षेत्र डी. पी. रिपोर्ट बुकमध्ये८.७५ हेक्टर दर्शविलेले आहे.आरक्षण CRZ च्या तरतुदीने अबाधित आहे. आरक्षणास अस्तित्वातील रस्त्याने प्रवेश मार्ग उपलब्ध आहे.आरक्षणाचे एकूण क्षेत्रापैकी ३.७१२ हे क्षेत्र महानगरपालिकेचे ताब्यात आलेले आहे. उर्वरित क्षेत्रापैकी ०.३२ हेक्टर क्षेत्रावर अतिक्रमण असून ४.७१२ हेक्टर क्षेत्र जागेवर मोकळे आहे. महानगरपालिकेचे ताब्यात आलेल्या क्षेत्रावर JNNURM अंतर्गत मल शुध्दीकरण केंद्र (STP) प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी ‘‘उक्त विकास योजना’’ आरक्षणा ऐवजी स्लॉटर हाऊस व मल शुध्दीकरण केंद्र (STP) असा फेर बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाच्या फेरबदलासाठी ठाणे महानगरपालिकेच्या मा. सर्व साधारण सभेने ठराव क्र. २४७ दि. १८/३/२०१० नुसार मंजूरी दिलेली आहे. ( यापुढे ‘‘उक्त फेरबदल’’ असे संबोधिले आहे.)

आणि त्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार "उक्त मंजुर विकास योजनेत उक्त फेरबदलाबाबत" आम जनतेच्या सुचना / हरकती मागविणेसाठी ही सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहा.संचालक नगर रचना, ठाणे महानगरपालिका, डॉ. अल्मेडा मार्ग, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सुचना फलकावर लावण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तिस सुचना / हरकत घ्यावयाची असल्यास त्याने ही सुचना वृत्तपत्रात आणि महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसांचे आत आपली सुचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, यांचेकडे सादर करावी.

(सु. च. हजारे )
सहाय्यक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

स्थळ :- ठाणे.
दिनांकः-

# THANE MUNCIPAL CORPORATION, THANE

## NOTICE

(U/s 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966)

No. Date :

Whereas the Revised Development Plan of the City of Thane has been sanctioned by Government Vide Notification No. TPS/1297/1319/CR-198/97/UD-12 Dt. 4th October, 1993 & came into force from 22nd November, 1999, Also the Excluded Portion (EP) from Revised Development Plan were sanctioned vide Government's Notification TPS/1201/274/CR-4/2001/UD-12 Dt. 3rd April, 2003 & came into force from 14th May, 2003 (Hereinafter referred to as "The said sanctioned Development Plan")

Whereas in said sanctioned Development Plan a reservation for "Slaughter house " is not shown in Sector No. 9 and No. 10. Reservation for "abbator No. 1" is shown at village Desai which is away from Mumbra – Kausa region. Approximately 77% portion of reservation is affeceted by CRZ stipulations & remaining area is enchroached. Presently Access road has not available to this reservation . Thus Location of this reservation is unsuitable & incovinient to the People

And Whereas in said Sanctioned development plan a reservation for " Recreation Ground No – 4 " is shown on plot bearing S. No. 53 pt, 55 pt, 56 pt, 57 pt, 58 pt, 61 pt, at village Mumbra & S. No. 28 pt to 30 pt, 32 pt, 38 pt at village Kausa. As per D. P. report Book area of Resevvation is 8.75 Ha. Reservation is Unaffected by CRZ Stipulations. Reservation has access by existing road. Presently 3.712 Ha. area is in possession of Corporation. Underground Sewerage project under JNNURM is in progress and STP is proposed in the reservation Area.

And Whereas the General Body of the Thane Municipal Corporation Vide its resolution No. 247 Dt. 18/3/2010 has accorded sanction to modify the purpose of Reservation as "STP & Slaughter house" instead of Recreation Ground as per provision made u\s 37 of Maharashtra Regional & Town Planning act, 1966.
( Hereinafter referred as the said modification).

And therefore, this notice is published to invite suggestions / objections from public to carry out "The said Modification in said sanctioned Development Plan" as per the provisions made U/s 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. The plan showing said modification in "Said Sanctioned Development Plan" is displayed on the notice board in the office of Asstt. Director Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporaion, Dr. Almeida Marg, Panchpakhadi, Thane. Any person who would like to submit his suggestion / objection to the said modification within 30 (Thirty) days from the publication of this notice in the news paper and the Maharashtra Government Gazattee, to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation.

(S. H. Hajare),
Asstt. Director Town Planning,
Thane Municipal Corporaion,Thane.